# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिकेची धूळ नियंत्रण मोहीम**

मिरा-भाईंदर शहरातील वाढत्या धूळकणांच्या प्रमाणावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनामार्फत विशेष धूळ नियंत्रण मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण व पर्यावरणीय संतुलन राखण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार डस्ट कंट्रोल यंत्रणेच्या सहाय्याने शहरातील विविध भागांमध्ये नियमितपणे पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. या उपाययोजनांमुळे रस्त्यावरील उडणाऱ्या धूळकणांचे प्रमाण कमी होऊन हवेच्या गुणवत्तेत सुधारणा होत आहे.

या मोहिमेअंतर्गत शहरातील प्रमुख व वर्दळीच्या मार्गांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फाऊंटन ते गायमुख या मार्गावर डस्ट कंट्रोल मशीनच्या सहाय्याने पाण्याची व्यापक फवारणी करण्यात आली. सततची वाहतूक, विविध विकासकामांमुळे होणारे रस्ते खोदकाम तसेच कोरड्या हवामानामुळे निर्माण होणारे धूळकण लक्षात घेता ही कारवाई प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

तसेच, प्रभाग समिती क्रमांक 01, 02, 03, 04, 05 आणि 06 च्या कार्यक्षेत्रातील प्रमुख रस्ते व प्रदूषणप्रवण परिसरांमध्येही डस्ट कंट्रोल यंत्रणेच्या माध्यमातून पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. यासोबतच, शहरात कार्यरत असलेल्या आर.एम.सी. (रेडी मिक्स काँक्रीट) प्लांटमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत असल्याने; त्यासंबंधित आरएमसी प्लांटची तपासणी करून आवश्यक ठिकाणी नियमभंग आढळल्यास कारवाई करण्यात येत आहे. धूळ, कचरा आणि प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात आले आहे.

नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असून, आगामी काळातही शहरातील विविध भागांमध्ये पाण्याची फवारणी, स्वच्छता मोहिमा आणि धूळकण नियंत्रण उपाययोजना नियमितपणे राबविण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.